MHWS090003432021

दाखल दिनांक : १९.०३.२०२१

नोंदणी दिनांक : १९.०३.२०२१

निकाल दिनांक : १३.०५.२०२६

कालावधी : **०५** व., **०१** म., **२४** दि.

# <u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०२१** **निशाणी क्र.–८५**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ७८/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | तुळशिराम रामजी राठोड व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विधीज्ञ श्री. डी. ए. चव्हाण |

## <u>गुन्हयाचा तपशिल</u>

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १८/०२/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | १९/०२/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १८/०२/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | १९/०३/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१/०९/२०२२ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | **तुळशिराम रामजी राठोड**<br>वय : ६२ वर्षे, धंदाः मजुरी<br>**मिराबाई तुळशिराम राठोड**<br>वय : ४९ वर्षे, धंदाः ––<br>**सुनिता इंदल आडे**<br>वय : ३० वर्षे, धंदाः घरकाम<br>**वंदना उमेश आडे**<br>वय : २८ वर्षे, धंदाः घरकाम<br>सर्व रा. भुली<br>ता. मानोरा, जि.वाशिम | –– | –– | भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक १३/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**<u>सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की</u>,**

**२.** घटना दिनांक १८/०२/२०२१ रोजी ०८:३० वाजताचे दरम्यान ग्राम– भुली, ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी फिर्यादी त्याच्या घराच्या पाठीमागे असलेल्या अडीचफुट जागेवर कंपाउंड करत होता. त्यावेळेस आ.क्र.१ ने त्याला त्याच्या हद्दीत कंपाउंड येवू देवू नको असे म्हटले. त्यावेळेस आ.क्र.२ ते ४ यांनी फिर्यादीस अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली व आ.क्र.१ ने बाजुला पडलेला दगउ उचलून फिर्यादीच्या कपाळाला

मारुन जखमी केले व इतर आरोपींनीही लाथा–बुक्याने डोक्यावर मारहाण केली.त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलिसांनी आरोपी विरुध्द गुन्हा क्र.७८/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ प्रमाणे नि.क्र.२० वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्याने तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी नि.क्र.२१ ते २४ वर आहे. सरकारपक्षाने आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ पाच साक्षीदार, सा.क्र.१ खुशाल रविसिंग चव्हाण (पंच) यांना नि.क्र.३२ वर, सा.क्र.२ जगदीश प्रकाश राठोड (साक्षीदार) यांना नि.क्र.४० वर, सा.क्र.३ अनिल मुलाराम चव्हापण (साक्षीदार) यांना नि.क्र.४४ वर व सा.क्र.४ अरुण दगडूसिंग राठोड (साक्षीदार) यांना नि.क्र.५७ वर व सा.क्र.५ सुनिल रामजी चव्हाण (साक्षीदार) यांना नि.क्र.५८ वर तपासले आहे. अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी प्रकरणातील फिर्यादी, इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर केले नाही. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र. ७२ ते ७५ वर नोंदविण्यात आले.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक १८/०२/२०२१ रोजी सकाळी ०८:३० वाजताचे सुमारास ग्राम–भुली, ता.मानोरा, जि. वाशिम येथे आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी यांना दगडाने कपाळावर मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **... नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला इच्छापुर्वक मारहाण करुन दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **... नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला शांतता भंग करुण अपमान केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबतः–</u>**

**७.** वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. साक्षीदार क्र.२, ३ व ४ हे प्रकरणातील साक्षीदार असून त्यांनी कथन केले की, घटनेच्या दिवशी आ.क्र.१ ने फिर्यादीच्या डोक्यावर दगड मारले असल्याने फिर्यादीस दुखापत

झाली होती. वरील साक्षीदारांनी पुढे वस्तु–अ वरील दगड ने फिर्यादीला मारलेबाबत सांगितले. तसेच इतर आरोपींनी लाथा–बुक्याने मारहाण केल्याचे कथन केले. सा.क्र.१ प्रकरणातील पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांचेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्याची बाब नकारली असून उलटतपासात पंचनामा त्यांचेसमक्ष तयार केल्याचे सांगितले. सा.क्र.५ प्रकरणातील साक्षीदार असून त्यांनी त्यांचेसमक्ष घटना घडल्याचीबाब स्पष्टपणे नकारली आहे. म्हणून त्यांचे पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

८. प्रकरणात अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी प्रकरणातील फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, दुसरे पंच, इतर साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी व तपास अधिकारी यांना साक्षकामी हजर केलेले नाही. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी व जखमी साक्षीदाराच्या पुराव्या अभावी आरोपी विरुद्ध गुन्ह्याचे घटक सिद्ध होवू शकत नाही. म्हणून सा.क्र.१ ते ४ यांचे पुराव्यावर गुन्ह्याचे घटक सिद्ध करणेहेतु विश्वास ठेवता येत नाही. वर कथन केलेप्रमाणे आरोपींनी फिर्यादीस कथित मारहाण करुन शिवीगाळ केल्याचे व जीवे मारण्याची धमकी दिल्याचीबाब पुरक वैद्यकिय, कागदोपत्री, फिर्यादी, वैद्यकिय साक्षीदार व इतर साक्षीदरांच्या पुराव्याअभावी सिद्ध झालेली नाही. गुन्ह्याचे घटक सिद्ध करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील आरोप सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ५ बाबतः–**

९. वरील सर्व बाबींचा तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपीने कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीला कथित मारहाण करुन जखमी केल्याचे तसेच शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचीबाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.५ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आ.क्र.१ **तुळशिराम रामजी राठोड,** आ.क्र.२ **मिराबाई तुळशिराम राठोड,** आ.क्र.३ **सुनिता इंदल आडे व** आ.क्र.४ **वंदना उमेश आडे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ३२४,५०४ व ५०६ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक दगड मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.13 18:16:17 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२ ), मानोरा

दि. १३/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | - | (Ms. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 13/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 13/05/202 |
| Judgment/Order uploaded on | - | 13/05/2026 |